# नियमीत दिवाणी दावा क्र. ०१/२०२० मधील अर्ज नि.क्र.५६ वरील आदेश

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रीया संहीता आदेश ६, नियम १७ नुसार दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा हा सरस–निरस मानाने वाटणी मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर दावा न्यायप्रविष्ठ असतांना सन २०२१ ते २०२३ मध्ये सदरहू दावा मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी हायवेच्या बाजूकडील ०हे–१९आर एवढे क्षेत्र राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३एल चे चौपदरीकरणासाठी शासनाने संपादीत केलेली आहे. त्यामुळे दाव्यात दुरुस्ती करणे भाग झालेले आहे. त्यामुळे सदर दावा कलम १ च्या खाली ''वर दावा कलम मध्ये उल्लेखित शेत मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी सन २०२१ ते २३ मध्ये सदरहू दावा मिळकतीच्या ०हे–९५ आर या क्षेत्रापैकी हायवेच्या बाजूकडील ०हे–१९आर एवढे क्षेत्र राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३एल चे चौपदरीकरणासाठी शासनाने संपादीत केलेली आहे.'' याप्रमाणे मजकूर टाकण्यात यावा. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही किंवा प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होत नाही. याउलट, सदरची दुरुस्ती केल्यास न्यायालयास न्यायनिवाडा करण्यासाठी मदतच होईल. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती तिने केली.

३. प्रतिवादींतर्फे प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले. प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, सदरील अर्जास कोणतेही संयुक्तिक व सबळ कारण नाही. वादी यांचा पुरावा आलेला आहे. त्यामुळे वादी यांना दुरुस्ती करता येणार नाही. सदर दुरुस्ती झाल्यास दाव्याचे संपुर्ण स्वरुप बदलेल. सदर कामी जिल्हाधिकारी किंवा भु–संपादन अधिकारी यांना प्रतिपक्षात सामील करावे. त्यांच्या संमतीशिवाय दुरुस्ती करता येणार नाही. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करुन वादीवर कॉस्ट बसविण्याची विनंती त्यांनी केली.

४. वादी व प्रतिवादी यांचे विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

५. दावा, कैफीयत, प्रस्तुत अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावर दाखल

कागदपत्रांचे अवलोकन केले. त्यावरुन असे दिसून येते की, वादी याने प्रस्तुतचा दावा हा वाटणी होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीचे अर्जातील असे कथन आहे की, सदर दावा न्यायप्रविष्ठ असतांना सन २०२१ ते २०२३ मध्ये सदरहू दावा मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी हायवेच्या बाजूकडील ०हे–१९आर एवढे क्षेत्र राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३एल चे चौपदरीकरणासाठी शासनाने संपादीत केलेली आहे. त्यामुळे दाव्यात दुरुस्ती करणे भाग झालेले आहे.

५. दिवाणी प्रक्रीया संहीता आदेश ७, नियम १७ मधील तरतूदीनुसार दाव्यातील कोणत्याही स्थितीत (at any stage) दाव्यात किंवा कैफीयतमध्ये दुरुस्ती करण्याचे प्रावधान करण्यात आलेले आहे. तथापी, दाव्याची सुनावणी सुरु झाल्यानंतर योग्य तत्परता व सबळ कारणाविना दाव्यात किंवा कैफीयतमध्ये दुरुस्ती करणे प्रतिबंधीत करण्यात आलेले आहे. प्रस्तुत अर्जातील दुरुस्तीचे कारणांचा विचार करता प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास दाव्यातील गुंतागुंत वाढून त्यातील मुख्य कामकाज दिर्घ काळ प्रलंबित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत, सदर दुरूस्ती अर्ज मंजूर केल्यास, दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणताही बदल होत नाही. त्याचप्रमाणे वादीच्या मागणीत देखील बदल होत नाही. तसेच, मूळ दाव्यात प्रस्तावीत दुरुस्ती केल्यास प्रतिवादींचे काहीएक नुकसान होणार नाही. उलटपक्षी, वादी व प्रतिवादी यांच्या संपूर्ण स्थावर मिळकती न्यायालयासमक्ष येतील व दोन्ही पक्षांतील वादाचे निराकरण होणेकरीता मदतच होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रस्तुत आदेशापासून १४ दिवसांचे आत मूळ दाव्यामध्ये प्रस्तावीत दुरुस्ती करावी.

PAWAR BALASAHEB GANGADHAR
Digitally signed by PAWAR BALASAHEB GANGADHAR
Date: 2025.03.05 10:41:45 +0530

(बी.जी.पवार)
दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
मुक्ताईनगर, जि. जळगांव.

दि. ०४/०३/२०२५.